ePaper

वर्ष - 9 I अंक -48 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 10 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हौस कशी पूर्ण करायची? सोन्याच्या भाववाढीने महिलां टेन्शनमध्ये!



### आतील पानांत


- एक चूक इंडियाला महागात पडली!
- रोहित, विराटचा अनुभव बहुमूल्य!
- जास्त बोलल्यानेच अशा घटना घडतात
- वादग्रस्त पार्श्वभूमी, पत्नीचे गंभीर आरोप



## भारत-जर्मनी आर्थिक धोरणात्मक संबंध पीएम मोदींच्या नेतृत्वात अधिक दृढ

# भारत-जर्मनीचा विश्वास अधिक मजबूत!

## महाराष्ट्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय : देवेंद्र फडणवीस

I मुंबई I प्रतिनिधी I
महाईन्यूज

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्यूज9 च्या ग्लोबल समिटमध्ये सहभाग घेतला असून, भारत आणि जर्मनीमधील मजबूत होत चाललेले आर्थिक आणि धोरणात्मक संबंध अधोरेखित केले. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबोधित करताना त्यांनी म्हटलं, “भारत आणि जर्मनीचा एकमेंकावर विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात हे संबंध आणखी मजबूत झाले आहेत.”**




- भारत-जर्मनी भागीदारीला २५ वर्षे पूर्ण
- पीएम मोदींच्या नेतृत्वात संबंध अधिक घट्ट
- जर्मन कंपन्यांची महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक
- महाराष्ट्राचा राष्ट्रीय गुंतवणुकीत ३१% वाटा
- फडणवीस: “जर्मनी हा महाराष्ट्राचा विश्वासू भागीदार”

फडणवीस म्हणाले की, भारत आणि युरोपियन संघामध्ये मुक्त व्यापार करार होणं अत्यावश्यक आहे, कारण यामुळे दोन्ही देशांच्या विकास प्रवासाला नवी गती मिळेल.

**“जर्मनी महाराष्ट्राचा विश्वासू भागीदार”**

फडणवीस म्हणाले की, “जर्मनी अभियांत्रिकीमध्ये उत्कृष्टता आणि अचूकता आणतो, तर भारत कौशल्य, युवा ऊर्जा आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा देतो. ही भागीदारी केवळ व्यापारापुरती मर्यादित नसून दीर्घकालीन सहकार्याची आहे.”

त्यांनी पुढे सांगितले की, फोक्सवॅगन, बीएमडब्ल्यू आणि मर्सिडीजसारख्या जर्मन कंपन्यांनी महाराष्ट्राला आपले दुसरे घर बनवले आहे. यामुळे राज्यात रोजगार निर्मितीला चालना मिळाली आहे आणि गुंतवणुकीचा प्रवाह वाढला आहे.

**महाराष्ट्र: भारताचं औद्योगिक इंजिन**

फडणवीस यांनी सांगितलं की, महाराष्ट्राचं भारताच्या जीडीपीमध्ये 14 टक्क्यांहून अधिक योगदान आहे, तर औद्योगिक उत्पादन आणि प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीतही राज्य आघाडीवर आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्रात तब्बल २० अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली असून, ती देशातील एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के आहे. राज्यातील “महा-परवाना”, “सिंगल विंडो क्लिअरन्स सिस्टीम” यांसारख्या धोरणांमुळे गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**“उज्वल भविष्याकडे सामायिक वाटचाल करूया”**

मुख्यमंत्री म्हणाले, “जर्मनी हा महाराष्ट्राच्या विकास, नवोपक्रम आणि दीर्घकालीन यशाचा खरा भागीदार आहे. आपण सर्वांनी मिळून उज्ज्वल आणि सामायिक भविष्य घडवूया.” फडणवीस यांनी या निमित्ताने टीव्ही 9 नेटवर्कचे एमडी आणि सीईओ बरुण दास तसेच संपूर्ण नेटवर्कचे अभिनंदन करत, अशा व्यासपीठांमुळे भारत-जर्मनी भागीदारी अधिक मजबूत होईल असा विश्वास व्यक्त केला.

## जर्मनीच्या भागीदारीतून महाराष्ट्रात गुंतवणूक कशी वाढली?

मुख्यमंत्री फडणवीस यांनी न्यूज9 ग्लोबल समिटमध्ये सांगितल, जर्मनीमध्ये न्यूज9 चं ग्लोबल समिट सुरू आहे, या ग्लोबल समिटमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हजेरी लावली. ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या ग्लोबल समिटमध्ये सहभागी झाले. यावेळी बोलताना त्यांनी राज्यात सुरू असलेल्या गुंतवणुकीबद्दल माहिती दिली. जर्मनीच्या भागीदारीतून महाराष्ट्रात गुंतवणूक कशी वाढली? मुख्यमंत्री फडणवीस यांनी न्यूज9 ग्लोबल समिटमध्ये सांगितले. जर्मनीमध्ये न्यूज9 चं ग्लोबल समिट सुरू आहे, या ग्लोबल समिटमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हजेरी लावली. ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या ग्लोबल समिटमध्ये सहभागी झाले. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, भारत आणि जर्मनी यांचा एकमेंकावर विश्वास आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांमधील संबंध आणखी मजबूत बनले आहेत. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, जर्मनी हा महाराष्ट्राचा विकास, स्टार्टअप आणि दीर्घकालीन यशाचा भागीदार आहे. जर्मनी हे ऑटोमोटिव्ह, अभियांत्रिकी आणि स्टार्ट्सअप यामध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर आहे, तर दुसरीकडे महाराष्ट्र हा मजबूत उत्पादन, सेवा क्षेत्र आणि वेगानं वाढणारी स्रार्टअप इकोसिस्टीम असलेलं भारताचे औद्योगिक इंजिन म्हणून उभे राहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत झाले आहेत, हे संबंध जे भविष्यातील उद्योग उभारणीच्या उद्देशानं व्यापाराच्याही पलीकडे खऱ्या सहकार्याकडे वळले आहेत. राज्यातील पुणे शहर ज्याला जर्मन गुंतवणूकदारांचे प्रवेशद्वार म्हटलं जातं, ते देशातील प्रत्येक पाच जर्मन कंपनींपैकी एका कंपनीचं घर बनलं आहे, यातून दोन्ही देशांमध्ये असलेला ताळमेळ स्पष्ट होतो. फोक्सवॅगन, बीएमडब्ल्यू, मर्सिडीज सारख्या जर्मन कंपन्यांनी महाराष्ट्राला आपले दुसरे घर बनवले आहे, असं यावेळी फडणवीस यांनी म्हटलं.महाराष्ट्राचं भारताच्या जीडीपीमध्ये जवळपास 14 टक्के एवढं योगदान आहे, तसेच औद्योगिक उत्पादन आणि प्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये देखील क्रमांक एकच राज्य आहे. 2024 मध्ये एकट्या महाराष्ट्रात 20 अब्ज डॉलरची गुंतवणूक झाली आहे, ज्याचं प्रमाण एकूण राष्ट्रीय गुंतवणुकीपैकी 31 टक्के इतकं आहे, अशी माहिती यावेळी फडणवीस यांनी दिली आहे, महा-परवाना, सिंगल विंडो क्लियरंस सिस्टीम यासारखे आमची धोरण गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्रात अधिक आकर्षित करतात, असंही यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे. दरम्यान भारत आणि जर्मनीमधील भागीदारीचे महत्त्व अधोरेखीत करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जर्मनी अभियांत्रिकीमध्ये उत्कृष्टता आणि अचूकता आणते तर भारत कौशल्ये, युवा ऊर्जा आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा प्रदान करतो.

**कामगारांचा मोर्चा**

**‘रस्ता नाही उद्योगनगरला, प्रकल्प जातील गुजरातला’**

# चाकणमधील कोंडीने त्रस्त उद्योजक

**‘नको आश्वासन, नको पर्याय’**




। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या चाकण औद्योगिक पट्ट्यातील उद्योजक, कामगार, नागरिकांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) आकुर्डी येथील कार्यालयावर गुरुवारी पायी मोर्चा काढला. ‘रस्ता नाही उद्योगनगरला, प्रकल्प जातील गुजरातला’, ‘तत्परता कर घेताना, उशीर का रस्ता देताना’, ‘नको आश्वासन, नको पर्याय, तत्काळ रस्ता हाच उपाय’, ‘पुरे झाले राजकारण, चाकणकरांचे होतेय मरण’, ‘कोंडीमुक्त चाकण होणार कधी, आम्ही चाकणकर फक्त मतदानापुरतेच का?’, ‘वाहतूक कोंडी मुक्त चाकण झालेच पाहिजे’, अशी जोरदार घोषणाबाजी आंदोलकांनी केली.**

चाकण कृती समितीतर्फे हा मोर्चा काढण्यात आला. निगडीतील भक्ती-शक्ती चौकातून दुपारी साडेबारा वाजता या पायी मोर्चाला सुरुवात झाली. खासदार डॉ.अमोल कोल्हे, आमदार बाबाजी काळे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांच्यासह स्थानिक नागरिक, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी मोर्चात सहभागी झाले होते. पीएमआरडीए स्थापन झाल्यापासून केवळ रुंद रस्त्यांचे आरक्षण कागदावर मिळाले आहे. प्रत्यक्षात मात्र असे काही झाले नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला.डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, ‘चाकण एमआयडीसी दीड लाख कोटींपेक्षा अधिक महसूल शासनाला देत आहे. त्याअनुषंगाने सुविधा दिल्या पाहिजेत. वाहतूक कोंडीमुळे चाकणचा श्वास गुदमरतो आहे. प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे कोंडीचा प्रश्न सुटत नाही. येथील कोंडीचा प्रश्न गुंतागुंतीचा झाला आहे. पीएमआरडीए, एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा संस्थांचा सहभाग आहे. या शासकीय संस्थामध्ये समन्वय नाही. रेल्वे, मेट्रो, रस्त्यांचा सर्वकष वाहतूक आराखडा (कॉम्प्रेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन) सहा वर्षांपासून बनविण्यात येत असल्याचे सांगितले जाते. हा आराखडा तयार करून त्यानुसार काम करावे. पालकमंत्री अजित पवारांच्या दौऱ्यानंतर काही अतिक्रमणे दूर झाली. पण, त्यामुळे कोंडीचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी उन्नत मार्गाची (एलिव्हेटेड) निविदा प्रक्रिया लवकर पूर्ण करून काम सुरू करावे’.‘कोंडीमुळे नागरिकांचे जीव जात आहेत. उद्योजक, कामगार, विद्यार्थी कोंडीने त्रस्त असतानाही अतिशय धिम्या गतीने कामे सुरू आहे. प्रशासकीय यंत्रणांनी योग्यवेळी कोंडीची दखल घेतली नाही, असा आरोप आमदार काळे यांनी केला. दरम्यान, चाकण आणि औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाय योजना सुरू आहेत. पुढील काही दिवसांत रस्त्यांसह विविध ३०० कोटींच्या कामांना सुरुवात होणार असल्याचे आयुक्त योगेश म्हसे यांनी शिष्टमंडळाला सांगितले. नाशिक फाटा ते चाकण, खेड हा रस्ता सन २००० साली पूर्ण झाला. चाकण चौकात एक मोठा पूल उभारण्याऐवजी दोन लहान पूल उभारले. २०२२ पर्यंतच्या वाहतुकीचे नियोजन करून हा रस्ता केला होता. पण, सन २०१५ मध्येच नियोजन कोलमडले आणि कोंडीस सुरुवात झाली. पालकमंत्री अजित पवारांनी दौरा केल्यानंतरही काहीच काम झाले नाही. उन्नत मार्गाची निविदा प्रक्रिया अद्यापही पूर्ण झाली नाही. समृद्धी महामार्ग दोन ते अडीच वर्षांत होतो. पण, चाकणमधील महामार्ग का होत नाही, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांनी केला.मोर्चा प्रवेशद्वारावर येताच पोलिसांनी अडवला. निवेदन देण्यासाठी आयुक्त दालनात जाऊन देण्याची मागणी आंदोलकांनी केली.

## मग चाकणमधील का नाही?

प्रशासनाने खाली येऊन निवेदन स्वीकारावे. त्यानंतर शिष्टमंडळ चर्चेला आयुक्तांच्या दालनात जाईल. लोकप्रतिनिधी, उद्योजक, कामगार चालत येवू शकतात, तर आयुक्त निवेदन घेण्यासाठी दालनाच्या खाली उतरू शकत नाहीत का, असा सवाल डॉ. कोल्हे यांनी केला. त्यानंतर प्रवेशद्वारावरच ठिय्या मांडत घोषणाबाजी केली. काही वेळाने डॉ. कोल्हे यांच्यासह शिष्टमंडळाला पीएमआरडीएच्या कार्यालयात सोडण्यात आले.

# पेठांच्या परिसरात रस्ते खोदाईला परवानगी

## पुणे : पोलिसांनी नेमलेल्या ठेकेदाराकडून शहरभर खोदकाम?



। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ‘सीसीटीव्ही’च्या केबल टाकरण्यासाठी महापालिकेने पोलीस विभागाला शहराच्या मध्यवर्ती भागातील पेठांच्या परिसरात रस्ते खोदाईची परवानगी दिली आहे. मात्र, पोलिसांनी नेमलेल्या ठेकेदाराने ही संधी साधून शहरातील विविध भागात रस्ते खोदाई केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महापालिकेकडून आता संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावण्यात येणार आहे.**

महापालिकेच्या पथ विभागाकडून शहरात विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी शासकीय, निमशासकीय तसेच खासगी संस्थांना ठरावीक शुल्क आकारून रस्ते खोदाईची परवानगी दिली जाते. विविध कामे करण्यासाठी पथ विभागाकडून एक ऑक्टोबर ते ३१ एप्रिलपर्यंत खोदाईसाठी परवानगी दिली जाते. त्यानंतर एक मे रोजी शहरातील खोदाईची कामे बंद करुन पावसाळा सुरू होण्यापूर्वी ३१ मे पर्यंत खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्त करून ते पूर्वस्थितीत आणणे बंधनकारक असते. पथ विभागाकडून पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यांची दुरुस्ती केली जाते.पावसाळ्यामध्ये रस्त्यांवर खड्डे पडल्याने वाहतुकीची कोंडी होते. त्यामुळे महापालिका प्रशासन पावसाळ्याच्या काळात केवळ अति महत्वाच्या, तातडीची निकड या कामासाठीच रस्ते खोदाईची परवानगी देते. त्यानुसार पथ विभागाने शहरातील पेठांच्या भागात रस्ते खोदण्यासाठी परवानगी दिली. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्यांची यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी महापालिकेने पोलीस विभागाला रस्ते खोदाईसाठी परवानगी दिली

## गुन्हा दाखल करण्याची धमकी

‘सीसीटीव्ही’ केबलसाठी खोदकाम करण्याचे काम दिलेल्या ठेकेदाराकडून गॅस कंपन्यांनी टाकलेल्या वाहिन्या, विद्युत वाहिन्या याकडे दुर्लक्ष करण्यात येते. त्यामुळे मोठी दुर्घटना घडू शकते, ही बाब ठेकेदाराच्या कामगारांच्या निदर्शनास आणून दिली. मात्र, ठेकेदाराने पोलिसांना ही माहिती दिल्यावर पोलीस कर्मचारी घटनास्थळी आले. त्यांनी गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

मोशी 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प

## कोट्यावधी रुपयांची बचत

# कचऱ्यातून वीज निर्मितीचा आदर्श नमुना!

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पातून १४ मेगावॅट वीज निर्मिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेने कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर यासाठी मोठे पाऊल उचलत मोशी कचरा डेपो येथे अत्याधुनिक 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पातून शहरातील कचऱ्यापासून १४ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती केली जात आहे. 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्वावर उभारण्यात आलेला हा प्रकल्प मे. अँटोनी लारा रिन्यूएबल एनर्जी प्रा. लि. या कंपनीने ऑक्टोबर २०२३ मध्ये कार्यान्वित केला असून, पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.**




ऑगस्ट २०२५ पर्यंत या प्रकल्पाद्वारे ३ लाख ४१ हजार १११ मेट्रिक टन कचऱ्यापासून तयार इंधन ( REFUSE DERIVED FUEL - RDF) वापरून १६ कोटी ६६ लाख ३६ हजार ७५० युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. यापैकी, प्रकल्प संचालनासाठी आवश्यक वीज खर्च वगळता १५ कोटी ५७ लाख ४० हजार १९८ युनिट्स वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ग्रीडमध्ये पुरवण्यात आली आहे. ही वीज महापालिकेच्या रावेत व चिखली जल शुद्धीकरण केंद्र, कासारवाडी व चऱ्होली मैलाशुद्धीकरण केंद्रे तसेच थेरगाव रुग्णालयात 'ओपन ॲक्सेस' संकल्पनेतून वापरली जात आहे. याशिवाय महापालिकेचे सहा नवीन वीज ग्राहक ज्यामध्ये वाय.सी.एम. रुग्णालय, चिखली, भाटनगर, आकुर्डी, पिंपळेनिलख आणि चिंचवड येथील मैलाशुद्धीकरण केंद्रे हे देखील येथे ओपन ॲक्सेस द्वारे लवकरच जोडले जाणार आहेत. या उपक्रमामुळे आतापर्यंत ७६ कोटी ५७ लाख रुपयांची वीज बिलातील बचत महापालिकेला साधता आली आहे.

या प्रकल्पामुळे मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचा भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. कचऱ्यातून हरित उर्जानिर्मितीमुळे शहराला स्वच्छ आणि पर्यावरणपूरक भविष्य मिळत आहे. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प हा पिंपरीचिंचवडसाठी एक आदर्श आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा नमुना ठरत आहे. तरी नागरिकांनी घरगुती व औद्योगिक कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- प्रकल्प क्षमता: १४ मेगावॅट/प्रतितास
- एकूण निर्मित वीज: १६ कोटी ६६ लाख ३६ हजार ७५० युनिट्स (ऑगस्ट २०२५ अखेरपर्यंत)
- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला पुरवलेली वीज: १५ कोटी ५७ लाख ४० हजार १९८ युनिट्स
- वीज बील सवलतीस पात्र युनिट्स: १० कोटी ०२ लाख ५८ हजार ४५६
- महापालिकेची एकूण वीज बचत: ७६ कोटी ५७ लाख रुपये
- वीजनिर्मितीसाठी वापरलेला कचरा: ३ लाख ४१ हजार १११ मेट्रिक टन

"पिंपरी चिंचवड महापालिकेस सध्या आवश्यक असणारी विजेची गरज 'वेस्ट टू एनर्जी' आणि 'सोलर एनर्जी'सारख्या अपारंपरिक उर्जास्त्रोतांचा प्रभावी वापर करून पूर्ण करण्याचा म्हणजेच नेट झिरो शहर बनविण्याचा आमचा मानस आहे. या दिशेने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**— अनिल भालसाकळे,**
सह शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# चाकणची वाहतूक कोंडी : मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## वाहतूक कोंडी, खड्डे, रस्त्यांच्या समस्यांवरून नागरिकांचा संताप

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आपण काम करत असल्याचे सांगत आहे. शेकडो, हजारो कोटींची कामे चाकण एमआयडीसी परिसरात सुरू असल्याचा दावा केला जातो. तरीही चाकणमधील वाहतूक कोंडी आणि इतर समस्या सुटल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या कामांचा चाकण परिसरातील स्थानिक नागरिक आणि कंपन्यांकडून निषेध करण्यात आला. तसेच आता केवळ आश्वासन नको तर कामे करून दाखवा, अशी आर्त हाक देत ट्रॅफिक मुक्त चाकण कृती समितीतर्फे गुरुवारी (दि. ९ ऑक्टोबर) पीएमआरडीए कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात नागरिकांचा प्रशासनावरील रोष पाहायला मिळाला.**



मोर्चाची सुरुवात चाकणमधील संग्रामदुर्ग किल्ल्यापासून झाली. हा मोर्चा तळेगाव चौक, आळंदी फाटा, धर्मवीर स्मारक मोशी, भक्ती शक्ती चौक मार्गे आकुर्डी येथील पीएमआरडीए कार्यालयावर पोहोचला. मोर्चात खासदार अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार बाबाजी काळे यांच्यासह शेकडो स्थानिक नागरिक आणि कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले. चाकण परिसरात १७०० लोकांचा मृत्यू झाल्याचा दावा आंदोलकांनी केला. पीएमआरडीए स्थापन झाल्यापासून केवळ रुंद रस्त्यांचे आरक्षण कागदावर टाकले आहे प्रत्यक्षात एक देखील टाकला नाही, असा आरोप आंदोलकांनी केला. खासदार अमोल कोल्हे म्हणाले, हा नागरिकांनी उभा केलेला लढा आहे. या लढ्याला पाठिंबा देणे एक लोकप्रतिनिधी म्हणून माझे कर्तव्य आहे. वाहतूक कोंडीमुळे चाकणचा श्वास गुदमरतो आहे. सर्व पीएमआरडीए, पीडब्ल्यूडी, महामार्ग प्राधिकरण, महावितरण अशा अनेक संस्था इथे काम करत आहेत. चाकणला मोकळा श्वास मिळावा यासाठी कॉम्प्रेहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. केवळ अतिक्रमण कारवाई करणे हे अतिक्रमण काढले असेल तर एवढ्या मोठ्या इमारतीला टाळे ठोकायचे का, असे म्हणत सरकार जनता से डरती है, पुलिस को आगे करती है, असे कोल्हे म्हणाले.

### पीएमआरडीएच्या दारात ठिय्या

मोर्चादरम्यान निवेदन देण्यासाठी आंदोलनकर्ते पीएमआरडीए कार्यालयाच्या दारात पोहोचल्यानंतर पोलिसांनी त्यांना अडविले. यादरम्यान पोलिस आणि खासदार अमोल कोल्हे यांच्यात शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. केवळ शिष्टमंडळाने आयुक्त दालनात जावे असे पोलीस सांगत होते. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी रस्त्यातच बसकण मडली.

**आंदोलनकर्त्यांचे थेट पालकमंत्र्यांना आव्हान!**

चाकणची अभूतपूर्व वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पालकमंत्री अजित पवार ताफ्यासह पाहणी दौरा केला. पण त्यांनी एकदा विना ताफ्याचा प्रवास वाहतूक कोंडीतून करुन दाखवावा. असे आव्हान आंदोलनकर्त्यांनी थेट अजित पवारांना दिले. सकाळी सहा वाजता पाहणी दौरा केलेल्या आणि प्रशासनाच्या कागदी घोड्यांवर विश्वास ठेवलेल्या अजित पवारांवर आंदोलकांनी संताप व्यक्त केला. आशिया खंडातील सर्वात मोठी चाकण एमआयडीसी हद्दपार होत आहे. याचं सरकार आणि प्रशासनाला सोयरसुतक नाही, अशी खंत ही एमआयडीसी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

# ब्राझीलचा ‘उठावखोर’ गोत्यात!




**लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर निरंकुश सत्ता उपभोगायची आणि लोकशाही मार्गानेच पराभव झाल्यानंतर मात्र, या व्यवस्थेची प्रतीके उद्‌ध्वस्त करण्यास निघायचे, असे आधुनिक ‘टूलकिट’ गेल्या काही वर्षांमध्ये दोन नेत्यांनी ठळकपणे आचरले. यांतील एक आहेत अमेरिकेचे माजी आणि इच्छुक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प. दुसरे आहेत ब्राझीलचे माजी, पराभूत अध्यक्ष जाइर बोल्सोनारो.**



या दोघांच्या कृत्यामध्ये एक मूलभूत फरक मात्र आहे. ट्रम्प यांनी निवडणूक निकाल जाहीर होऊ लागताच आकांडतांडव केले. निकालांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्याविषयी शंका उपस्थित करण्यास सुरुवात केली आणि पराभव सुनिश्चित झाल्यानंतर अमेरिकी कायदेमंडळाच्या इमारतीवर आपल्या समर्थकांना चाल करून जाण्यास चिथावले. ब्राझीलची अध्यक्षीय निवडणूक त्या घटनेनंतर (६ जानेवारी २०२१) जवळपास वर्षभराने झाली. त्या निवडणुकीत पराभव होणार याची आधीच चाहूल लागल्यामुळे, ही निवडणूकच मोठा घोटाळा असल्याची बोगस माहिती बोल्सोनारो समर्थकांमार्फत पसरवली गेली. जेणेकरून त्या एका कारणास्तव निवडणूक प्रक्रियेतील लष्करी हस्तक्षेप समर्थनीय ठरावा. या प्रयत्नांमध्ये काही लष्करी अधिकारी, पोलीस अधिकारी, गुन्हेगारी टोळ्या सहभागी असल्याचा निष्कर्ष ब्राझीलच्या पोलिसांनी काढला. या पोलिसांना तपासाचा सर्वाधिकार ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाकडून बहाल झाला आहे. यासंदर्भात गेल्या आठवड्याभरात विविध ठिकाणी छापासत्र झाले, काही जणांना अटक करण्यात आली. उठाव करून ब्राझीलमधील लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा कट होता. अशा अस्थिर वातावरणात त्यावेळी अध्यक्ष असलेले बोल्सोनारो यांचा प्रदीर्घकाळ सत्तेवर राहण्याचा मार्ग मोकळा होणार होता.ऑक्टोबर २०२२मध्ये झालेली निवडणूक बोल्सोनारो हरले. ही निवडणूक प्रदीर्घ काळ लांबली आणि अंतिम निवडीसाठी फेरनिवडणुकीचा मार्ग अवलंबावा लागला होता. पण पराभव झाल्यानंतर काही दिवसांनी, विशेषतः ८ जानेवारी २०२३ रोजी राजधानी ब्रासिलिया शहरात बोल्सोनारो समर्थकांनी धुडगूस घातला. त्यांना लष्कराकडून अपेक्षित समर्थन मिळाले नाही.तरीदेखील अध्यक्षीय प्रासाद, कायदेमंडळाची इमारत, सर्वोच्च न्यायालयाची इमारत अशा महत्त्वाच्या ठिकाणांवर हे समर्थक चाल करून गेले. बोल्सोनारो या उठावखोरीमध्ये सकृद्दर्शनी दोषी आढळले आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यास त्यांना २९ वर्षांचा कारावास होऊ शकतो. आपण निर्दोष असल्याचे आणि आपला छळ सुरू असल्याचे ते आजही सांगतात. मात्र पोलीस तपासास साह्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली असून, पारपत्रही पोलिसांच्या हवाली केले आहे. गतवर्षी ब्राझीलियन काँग्रेसच्या एका समितीने त्यांना उठावखोरीप्रकरणी दोषी ठरवले. तत्पूर्वी एका न्यायालयाने याच कारणास्तव त्यांच्यावर २०३०पर्यंत कोणतीही निवडणूक लढवण्यावर बंदी आणली. बोल्सोनारो यांचे आदर्श डोनाल्ड ट्रम्प! गतवर्षी निवडणूक हरल्यानंतर ते अमेरिकेतच ट्रम्प यांचा पाहुणचार घेण्यासाठी गेले होते. रीतसर झालेल्या निवडणुकीच्या सत्यतेविषयी चुकीची माहिती पसरवायची, समर्थकांना चिथावून रस्त्यावर आणायचे आणि लोकशाहीच्या प्रतीकांवर चाल करून जायची हा धक्कादायक प्रकार अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच ६ जानेवारी २०२१ रोजी घडला होता. असे उठाव आणि जानेवारी महिना हे ट्रम्प यांच्याप्रमाणेच बोल्सोनारो यांनाही आदर्शवत वाटले असावेत. पण अमेरिकेइतकी ब्राझीलची न्याय व तपास यंत्रणा गोंधळलेली दिसत नाही.अमेरिकेमध्ये तर विविध न्यायालयांमध्ये ट्रम्प यांच्याविरुद्ध उठावखोरीचा खटला दाखल करण्यावरच एकमत होत नाही. त्यांनी अशी कृती केली- म्हणजे चिथावणी दिली त्यावेळी ते अध्यक्ष होते. अशा व्यक्तीस काही स्वरूपाच्या गुन्ह्यांपासून पदसिद्ध संरक्षण मिळते किंवा कसे यावरच तेथे अजून खल सुरू आहे. तशात अमेरिकी अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ट्रम्पच उतरवले जातील.

## संपादकीय »

### उपायाचा अपाय

***गव्हाच्या आधारभूत किमतीत १०९ टक्क्यांची वाढ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय राजकीय असेल, पण त्यामुळे देशाच्या कृषी प्रारूपाविषयी प्रश्न निर्माण होतात...***

आगामी दोन दशकांत विकसित भारत करण्यासाठी आर्थिक वाढीचा दर किमान आठ टक्के असायला हवा’ अशा अर्थाचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे विधान वास्तवतेची जाणीव दर्शवते. म्हणून ते स्वागतार्ह. स्वागत अशासाठी की सध्याच्या सहा टक्क्यांच्या गर्तेत अडकलेली आपली अर्थव्यवस्था आपणास अपेक्षित प्रगतीसाठी पुरेशी नाहीवाढणारी अर्थव्यवस्था म्हणून सहा टक्क्यांवर आनंदोत्सव करणाऱ्यांची आपल्याकडे कमतरता नाही. त्या पार्श्वभूमीवर अर्थमंत्र्यांनीच वास्तवता दर्शवणे केव्हाही शहाणपणाचेच. ही विकासगती साधायची तर प्रगतीसाठी आवश्यक सर्व आघाड्यांवर दमदार कामगिरी नोंदवावी लागेल. शारीरिक सुदृढतेसाठी ज्याप्रमाणे नुसत्या दंडातील बेटकुळ्या पुरेशा नसतात त्याप्रमाणे प्रदेशाच्या ऊर्जितावस्थेसाठी सर्वच घटकांचा अर्थविकास गरजेचा असतो.

**यंदाच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा असतील, ही अपेक्षा खोटी ठरवून देश मजबूत करण्यासाठी सिमेंट, ऊर्जानिर्मिती, कोळसा या उद्योगांना तसेच अन्य नवउद्योगांना मदतगार ठरणारे निर्णय सरकारने घेतले. गरीबांसाठी सौरऊर्जा, घरांसाठी साह्य आणि आरोग्य विम्यासारख्या सुविधांची व्याप्ती वाढवण्याचा विचारही यंदा दिसून आला.**

# लोकानुनय नव्हे; देशाची उभारणी!



दशकभरापूर्वी वित्तभांडवलाच्या जागतिक क्षेत्रात कायकाय कूट-शब्द वापरले जात, हे जरा आठवून पाहा- ‘फ्रॅजाइल फाइव्ह’ आणि ‘पीआयआयजीएस’ म्हणजे ‘पीग्ज’ हे चटकन आठवतील. यापैकी दुसरा शब्द हा मुख्यत: युरोपातल्या कर्जबाजारी देशांसाठी वापरला गेला, पण अतिनाजूक पाचांमध्ये (फ्रॅजाइल फाइव्ह) भारताचाही समावेश त्या वेळी केला जाई. कारण, ज्या अर्थव्यवस्था नुकत्या वाढू लागलेल्या असूनही इतरांवर फार अवलंबून होत्या आणि त्यामुळे बेभरवशी होत्या, त्यात आपणही मोजले जात होतो- हे सारे, द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधानपदी असताना आणि त्यांचे अर्थमंत्रीसुद्धा बुद्धिवंत असताना होत होते. या खिन्न अवस्थेतून आणि आर्थिक स्तब्धतेपासून ते ‘जगातील एकमेव उज्ज्वल स्थाना’पर्यंतच्या प्रवासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. पुढील काही महिन्यांत आपण सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जात असताना, अर्थव्यवस्थेची हाताळणी हा पंतप्रधानांच्या प्रगतीपुस्तकातील सर्वात तेजस्वी तारा आहे. हा आर्थिक संदर्भ आणि त्यातून येणारा राजकीय आत्मविश्वास यंदाच्या लेखानुदानातही (हंगामी अर्थसंकल्पातही) दिसून आला.लोकानुनयी अर्थसंकल्पाचीच अपेक्षा साऱ्यांना असूनसुद्धा, भारताचे दीर्घकालीन फायदे शीर्षस्थानी ठेवण्याच्या आपल्या ध्येयावर सरकार यंदा ठाम राहिले. याला हे देऊ कर, त्या गटाला ते आश्वासन दे, अशा अल्प-मुदतीच्या निवडणूक लाभांच्या दबावाखाली हे लेखानुदान आलेले नाही. याउलट, विकसित भारताचा मार्ग ज्या पायावर भक्कमपणे उभारला जाईल, असा पायाच लेखानुदानाने मजबूत केलेला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात, शाश्वत आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदल दिसून आले आहेत. त्यातही विशेष म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. या पायाभूत सुविधा फक्त अभियांत्रिकीपुरत्या नसून सामाजिक आणि डिजिटलही आहेत. ताज्या अर्थसंकल्पातही हे सूत्र कायम राहिले आहे. पायाभूत सुविधांवरील खर्चात आणखी ११.११ टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे, परिणामी ११.११लाख कोटी रुपये या क्षेत्राला मिळणार असून, एकंदर पायाभूत सुविधांची तरतूद यामुळे गेल्या चार वर्षांत तिप्पट झालेली आहे! पायाभूत सुविधांमध्येही यंदा रेल्वेवर भर देण्यात आला आहे. बंदरांशी जोडलेली वाहतूक-व्यवस्था, अत्यंत वर्दळीची रहदारी हे लक्षात घेऊन आणि ऊर्जा, खनिजे आणि सिमेंट क्षेत्रांसाठी उभारले जाणारे रेल्वेचे खास कॉरिडॉर मालवाहतुकीचा दर्जा आणि वेग सुधारतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

भाजपा ठरवणार का?

## ‘आय लव्ह मोहम्मद’ मध्ये गैर काय : ओवेसी

# कुणी काय बोलावे? कोणावर प्रेम करावे?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जातीयवाद हा भाजपचा ‘अजेंडा’च आहे. त्यावर ते आपली राजकीय पोळी भाजतात. या देशात ९८ ते ९९ टक्के जनता कोणत्या ना कोणत्या धर्माला मानते. मुस्लिम समाजात हजरत मोहम्मद पैगंबर यांना सर्वोच्च स्थान आहे. ‘आय लव्ह मोहम्मद’च्या माध्यमातून त्यांच्या भावना व्यक्त होत आहेत. त्यात गैर काय?**

## जातीयवाद हा भाजपचा अजेंडा



संविधानात काय तरतुदी आहेत, कुणी काय बोलायचे, कुणावर प्रेम करायचे हे भाजप ठरवणार का? प्रेमाबद्दल त्यांना एवढा तिरस्कार का? अशी टीका एमआयएमचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी टीका केली. नगर शहरात मुस्लिम समाजाविरुद्ध भावना भडकवणारी विधाने केली जात आहेत, त्यामागे सरकार असल्याचाही आरोप त्यांनी केला.नगर शहरातील मुकुंदनगर भागात खासदार ओवेसी यांची सभा आज, गुरुवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती. या सभेस उपस्थित राहाण्यासाठी खासदार ओवेसी नगरमध्ये आले होते. सभेपूर्वी त्यांनी सरकारी विश्रामगृहावर पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर टीका केली. खासदार ओवेसी यांची यापूर्वीची सभा ऐनवेळी रद्द करण्यात आली होती. नगर शहरातील रांगोळी प्रकरण व त्यानंतर झालेला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न यासंदर्भात बोलताना खासदार ओवेसी यांनी शहरात शांतता आवश्यक आहे. परंतु, कोणी काय लिहायचे व बोलायचे, हे भाजप ठरवणार का, असा प्रश्न उपस्थित केला. विधानसभा निवडणुकीनंतर बदललेले राजकारण, अहिल्यानगर शहर मुस्लिम समाजाविरोधात होणारी विधाने यावर बोलताना खासदार ओवेसी म्हणाले, जे लोक हे करत आहेत ते सरकारच्या पाठिंब्यामुळेच. ज्यांनी अशी विधाने केली, शिव्या दिल्या, त्यांना मंत्री केले गेले, हे सरकारचे अपयशच आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याकडे लक्ष वेधत हा दलित समाज व न्यायव्यवस्थेचा अपमान आहे. ही विकृत मानसिकता असल्याचेही त्यांनी म्हटले. हे कृत्य करणारा कोणी तरुण नव्हता तर ७० वर्षांचा वृद्ध होता, याकडे त्यांनी लक्ष वेधले. राज्यातील पूरस्थिती व अतिवृष्टीमुळे बाधितांना राज्य सरकारने पॅकेज जाहीर केले. मात्र, याऐवजी कर्जमाफीच व्हायला हवी, अशी मागणी त्यांनी केली. लडाखमधील नागरिकांच्या मागण्या योग्य आहेत. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करत सरकार चुकीच्या पद्धतीने परिस्थिती हाताळत आहे. ज्यांनी पूर्वी ३७० कलम रद्द झाल्याबद्दल पाठिंबा दिला,

## संविधानात काय तरतुदी आहेत

ज्यांनी अशी विधाने केली, शिव्या दिल्या, त्यांना मंत्री केले गेले, हे सरकारचे अपयशच आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याकडे लक्ष वेधत हा दलित समाज व न्यायव्यवस्थेचा अपमान आहे. ही विकृत मानसिकता असल्याचेही त्यांनी म्हटले. हे कृत्य करणारा कोणी तरुण नव्हता तर ७० वर्षांचा वृद्ध होता, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

त्यांनाच सरकार आज अटक करत आहे. मात्र, त्याऐवजी सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण करायला हव्यात, सोनम वांगचुक हे तर मॅगसेस पारितोषिक विजेते आहेत, असेही खासदार ओवेसी म्हणाले. संविधानात काय तरतुदी आहेत, कुणी काय बोलायचे, कुणावर प्रेम करायचे हे भाजप ठरवणार का? प्रेमाबद्दल त्यांना एवढा तिरस्कार का? अशी टीका एमआयएमचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी टीका केली. नगर शहरात मुस्लिम समाजाविरुद्ध भावना भडकवणारी विधाने केली जात आहेत, त्यामागे सरकार असल्याचाही आरोप त्यांनी केला.नगर शहरातील मुकुंदनगर भागात खासदार ओवेसी यांची सभा आज, गुरुवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती. या सभेस उपस्थित राहाण्यासाठी खासदार ओवेसी नगरमध्ये आले होते. सभेपूर्वी त्यांनी सरकारी विश्रामगृहावर पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर टीका केली. खासदार ओवेसी यांची यापूर्वीची सभा ऐनवेळी रद्द करण्यात आली होती.नगर शहरातील रांगोळी प्रकरण व त्यानंतर झालेला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न यासंदर्भात बोलताना खासदार ओवेसी यांनी शहरात शांतता आवश्यक आहे. परंतु, कोणी काय लिहायचे व बोलायचे, हे भाजप ठरवणार का, असा प्रश्न उपस्थित केला.विधानसभा निवडणुकीनंतर बदललेले राजकारण, शहर मुस्लिम समाजाविरोधात होणारी विधाने यावर बोलताना खासदार ओवेसी म्हणाले, जे लोक हे करत आहे.

# बचतगट चळवळ ते जनधन योजना

## निवृत्त बँक अधिकारी नानल यांच्या कार्याचा ‘सातारा भूषण’ने सन्मान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सातारा जिल्ह्याचे निवृत्त अग्रणी बँक अधिकारी, अर्थविषयक अभ्यासक आणि साहित्यप्रेमींतर्फे श्रीराम नानल यांना नामदेव महाराज हरड यांच्या हस्ते सातारा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब निकम, उपाध्यक्ष माजी आमदार बाबुराव माने, खजिनदार संजय यादव, शिवकृपा पतपेढीचे अध्यक्ष गोरखनाथ चव्हाण, महेश पवार, प्रकाश निपाणे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.**

नवी मुंबई, ठाणे तसेच जुन्या गिरणगावातील सातारकर मंडळींनी स्थापन केलेल्या ‘आम्ही सातारकर विकास प्रतिष्ठान’तर्फे हा पुरस्कार देण्यात येतो.नानल यांनी जिल्ह्यात अग्रणी बँकेच्या मार्फत जिल्ह्यात बचतगट चळवळ उभी केली. २०१२ मध्ये निवृत्तीनंतरही त्यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी एम रामास्वामी यांच्या सूचनेनुसार जिल्ह्याचा पायाभूत सुविधांचा विशेष आराखडा तयार करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. ऑगस्ट २०१४ नंतर सातारा जिल्ह्यासाठी महाराष्ट्र बँकेसाठी जनधन योजनेचे सल्लागार या नात्याने एका वर्षात ६० हजार नवीन




बचत खाती उघडून घेतली. राष्ट्रीय जीवन उन्नती अभियान या अंतर्गत मुख्य प्रशिक्षक या नात्याने सातारा, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यातील शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केले. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी पुस्तके गोळा करून जिल्ह्यातील २३ वाचनालयांना सुमारे तीन हजार पुस्तके त्यांनी भेट देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. या वेळी श्री. नानल यांनी पुरस्काराबद्दल आभार व्यक्त करताना घरच्या मंडळींनी तो दिल्यामुळे हुरूप

## भेट देण्यात महत्त्वाचे योगदान

वाचन संस्कृती जोपासण्यासाठी पुस्तके गोळा करून जिल्ह्यातील २३ वाचनालयांना सुमारे तीन हजार पुस्तके त्यांनी भेट देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. या वेळी श्री. नानल यांनी पुरस्काराबद्दल आभार व्यक्त करताना घरच्या मंडळींनी तो दिल्यामुळे हुरूप वाढल्याचे सांगितले.

वाढल्याचे सांगितले. नानासाहेब निकम यांनी सातारकरांनी प्रतिष्ठानचे सभासद व्हावे, असे आवाहन या वेळी केले.नवी मुंबई, ठाणे तसेच जुन्या गिरणगावातील सातारकर मंडळींनी स्थापन केलेल्या हा पुरस्कार देण्यात येतो.नानल यांनी जिल्ह्यात अग्रणी बँकेच्या मार्फत जिल्ह्यात बचतगट चळवळ उभी केली. २०१२ मध्ये निवृत्तीनंतरही त्यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी एम रामास्वामी यांच्या सूचनेनुसार जिल्ह्याचा पायाभूत सुविधांचा विशेष आराखडा तयार करण्यात महत्त्वाचे योगदान दिलेराष्ट्रीय जीवन उन्नती अभियान या कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यातील शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षित केले.

## या कृत्याचा निषेध

## माजी न्यायमूर्ती काटजू यांनी या कृत्याचा निषेध केला

# जास्त बोलल्यानेच अशा घटना घडतात

## न्यायाधीशांनी न्यायालयात कमी बोलावे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर काही दिवसांपूर्वी एका वकिलाने बूट फेकून मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकारानंतर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांनी न्यायाधीशांनी न्यायालयात कमी बोलावे, असा सल्ला दिला आहे.**





इंडिका न्यूजसाठी लिहिलेल्या लेखात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांनी या कृत्याचा निषेध केला, परंतु असे म्हटले की अशा घटना अनेकदा न्यायालयीन कामकाजाच्या दरम्यान केलेल्या अनावश्यक टिप्पण्यांमुळे घडतात. "सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकल्याच्या घटनेचा मी निषेध करतो. परंतु त्याच वेळी, मी हेही सांगू इच्छितो की न्यायाधीशांनी न्यायालयात जास्त बोलल्यानेच अशा घटना घडतात", असे त्यांनी लेखात लिहिले आहे.खजुराहो येथील भगवान विष्णूंच्या मूर्तीच्या जीर्णोद्धारासाठीच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी याचिकाकर्त्याला म्हटले होते की, "जा आणि देवालाच काहीतरी करायला सांगा. तुम्ही म्हणता की तुम्ही भगवान विष्णूचे कट्टर भक्त आहात, मग जा आणि प्रार्थना करा."इंग्लंडचे माजी लॉर्ड चान्सलर सर फ्रान्सिस बेकन यांच्या हवाल्याने काटजू यांनी लिहिले की, "जास्त बोलणारा न्यायाधीश हा एका बेसूर झांजासारखा असतो. न्यायाधीशांचे काम न्यायालयात बोलणे नव्हे, तर ऐकणे आणि नंतर त्यांना जे योग्य वाटेल ते ठरवणे आहे", असे ते म्हणाले. ब्रिटिश न्यायालयाला भेट देण्याचा अनुभव सांगताना काटजू म्हणाले, "तिथे जवळजवळ पूर्णपणे शांतता होती. न्यायाधीश शांतपणे ऐकत होते आणि वकील अतिशय शांतपणे युक्तिवाद करत होते. कधी कधी, न्यायाधीश काही मुद्दा स्पष्ट करण्यासाठी वकिलाला प्रश्न विचारत असत, अन्यथा ते संपूर्ण दिवस शांत असायचे. न्यायालयाचे वातावरण असेच शांत असावे."दरम्यान, वकील राकेश किशोर यांनी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन केले आणि मध्य प्रदेशातील खजुराहो येथील जावरी मंदिरातील भगवान विष्णूंच्या मूर्तीच्या जिर्णोद्धार करण्याच्या मागणीच्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या टिप्पणीमुळे ते दुखावले असल्याचे म्हटले.सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर केलेल्या हल्ल्याबाबत बोलताना वकील राकेश किशोर यांनी त्यांना या कृत्याचा कोणताही पश्चात्ताप नसल्याचे म्हटले आहे. "हे मी केले नाही, हे देवाने केले आहे. भारताच्या सरन्यायाधीशांनी सनातन धर्माची थट्टा केली. हा देवाचा आदेश होता, कृतीची प्रतिक्रिया होती", असे ते म्हणाले.

### यांच्या टिप्पणीमुळे ते दुखावले

न्यायाधीश काही मुद्दा स्पष्ट करण्यासाठी वकिलाला प्रश्न विचारत असत, अन्यथा ते संपूर्ण दिवस शांत असायचे. न्यायालयाचे वातावरण असेच शांत असावे."दरम्यान, बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन केले आणि मध्य प्रदेशातील खजुराहो येथील जावरी मंदिरातील भगवान विष्णूंच्या मूर्तीच्या जिर्णोद्धार करण्याच्या मागणीच्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या टिप्पणीमुळे ते दुखावले असल्याचे म्हटले.

इंडिका न्यूजसाठी लिहिलेल्या लेखात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांनी या कृत्याचा निषेध केला, परंतु असे म्हटले की अशा घटना अनेकदा न्यायालयीन कामकाजाच्या दरम्यान केलेल्या अनावश्यक टिप्पण्यांमुळे घडतात. "सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकल्याच्या घटनेचा मी निषेध करतो. परंतु त्याच वेळी, मी हेही सांगू इच्छितो की न्यायाधीशांनी न्यायालयात जास्त बोलल्यानेच अशा घटना घडतात", असे त्यांनी लेखात लिहिले आहे.खजुराहो येथील भगवान विष्णूंच्या मूर्तीच्या जीर्णोद्धारासाठीच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी याचिकाकर्त्याला म्हटले होते की, "जा आणि देवालाच काहीतरी करायला सांगा. तुम्ही म्हणता की तुम्ही भगवान विष्णूचे कट्टर भक्त आहात, मग जा आणि प्रार्थना करा."इंग्लंडचे माजी लॉर्ड चान्सलर सर फ्रान्सिस बेकन यांच्या हवाल्याने काटजू यांनी लिहिले की, "जास्त बोलणारा न्यायाधीश हा एका बेसूर झांजासारखा असतो. न्यायाधीशांचे काम न्यायालयात बोलणे नव्हे, तर ऐकणे आणि नंतर त्यांना जे योग्य वाटेल ते ठरवणे आहे", असे ते म्हणाले. ब्रिटिश न्यायालयाला भेट देण्याचा अनुभव सांगताना काटजू म्हणाले, "तिथे जवळजवळ पूर्णपणे शांतता होती.

## वादग्रस्त पार्श्वभूमी, पत्नीचे गंभीर आरोप

## तरीही भाजपा 'या' अभिनेत्याला तिकीट देण्यावर ठाम

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मोठी घडामोड पाहायला मिळत आहे. भाजपाने निलंबित केलेल्या अभिनेत्याला पुन्हा पक्षात घेतले आहे. भोजपुरी सुपरस्टार पवन सिंह यांची पक्षात पुन्हा 'घरवापसी' झाली आहे. मात्र, या भोजपुरी अभिनेत्याची पार्श्वभूमी खूप वादग्रस्त राहिली आहे.**



भाजपात प्रवेश केल्यानंतर विरोधक पवन सिंह यांच्यावर पुन्हा आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. मुख्य म्हणजे पवन सिंह यांच्या पत्नीने माध्यमांसमोर येऊन, त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या आरोपांमुळे वादंग निर्माण झाला आहे. परंतु, असे असले तरी भाजपा त्यांना तिकीट देण्यावर ठाम आहे. यामागील कारण काय? समजून घेऊयात...२०२४ च्या बंगाल लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या वादामुळे आणि आता बुधवारी पवन सिंह यांच्या पत्नी ज्योती सिंह यांनी त्यांच्यावर केलेल्या गैरवर्तनाच्या आरोपांमुळे वादंग निर्माण झाला असतानाही पक्षाचा सिंह यांना बिहारमध्ये उमेदवारी देण्याचा आग्रह भाजपाची नवीन जातीय समीकरणे दर्शवतो. भाजपमधील सूत्रांनुसार, पक्ष त्यांना एका महत्त्वाच्या आणि निर्णायक राजपूत जागेवरून उमेदवारी देणार आहे. ही जागा कदाचित आरा असेल, अशी शक्यता आहे.प्रसिद्ध गायक, मानणारे सिंह २०२४ मध्ये वादळाच्या केंद्रस्थानी होते. आसनसोलमधून त्यांची उमेदवारी जाहीर होताच, आक्षेपार्ह विधाने, गाण्यांचे बोल आणि काही जुन्या व्हिडीओंमधील कृत्ये पुन्हा समोर आल्याने मोठा संताप निर्माण झाला.

### पवन सिंह केवळ एक सेलिब्रिटी

प्रशांत किशोर यांचा स्थानिक पातळीवर प्रभाव कमी आहे."आणि त्यामुळे त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. आता भाजपाच्या बिहार युनिटसाठी पवन सिंह केवळ एक सेलिब्रिटी चेहरा नाहीत, तर ते एक राजपूत प्रतीकदेखील आहेत. ते विरोधी पक्षाच्या पारंपरिक उच्च जातीय क्षेत्रात फूट पाडण्याची आणि संपूर्ण राजपूत पट्ट्यात तरुणांना ऊर्जा देण्याची क्षमता ठेवतात.

## योगिताने पुन्हा जिंकली मनं

'बिग बॉस मराठी'मध्ये झळकलेली योगिता चव्हाण नेहमी चर्चेत असते. सोशल मीडियावरील ट्रेंड होणाऱ्या गाण्यांवर ती जबरदस्त डान्स करत असते. त्यामुळे आता तिच्या डान्सचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. नुकताच योगिताने आणखीन एक डान्स व्हिडीओ शेअर करत पुन्हा एकदा एक्सप्रेशनने चाहत्यांची मनं जिंकली आहेत.'जीव माझा गुंतला' मालिकेतून घराघरात पोहोचलेली अंतरा म्हणजे अभिनेत्री योगिता चव्हाण 'बिग बॉस मराठी'मुळे प्रसिद्धी झोतात आली. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात योगिता चव्हाण झळकली होती. अभिनेता सौरभ चौघुलेबरोबर लग्न केल्यानंतर सात महिन्यांनी योगिता 'बिग बॉस मराठी'मध्ये पाहायला मिळाली. पण या वादग्रस्त शोमध्ये तिचा जास्त काळ टिकाव लागला नाही.

काही दिवसांत योगिता घराबाहेर झाली. परंतु, 'बिग बॉस'मधून बाहेर झाल्यापासून तिच्या डान्स कौशल्याची चर्चा नेहमी रंगली असते. योगिताने 'बिग बॉस'मध्ये जबरदस्त डान्स केला असता तर ती जास्त काळ टिकली असती, अशा नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया तिच्या डान्स व्हिडीओवर उमटल्या आहेत.नुकताच योगिताने सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत असलेल्या 'उई अम्मा' गाण्यावर डान्स केला आहे. बॉलीवूड अभिनेत्री रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी राशा थडानीच्या 'उई अम्मा' गाण्यावर योगिताने आपल्या एक्सप्रेशनने पुन्हा सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

## तेजश्री प्रधानच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट'

मराठी मालिकाविश्वातील आघाडीची अभिनेत्री म्हणजे तेजश्री प्रधान. तेजश्रीने आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे तिची कोणतीही भूमिका असो, ती सुपरहिट होतेच. जान्हवी असो, शुभ्रा असो किंवा मुक्ता तिची प्रत्येक भूमिका प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली आहे. पण, काही दिवसांपूर्वी तेजश्री प्रधानने खूप मोठा निर्णय घेतला. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली 'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केला. तिच्या या अचानक झालेल्या निर्णयामुळे चाहत्यांना धक्काच बसला.अभिनेत्री तेजश्री प्रधानने 'प्रेमाची गोष्ट' मालिका सोडण्यामागचं अद्याप कारण स्पष्ट केलेलं नाही. पण, 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्रीची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. आता मालिकेत मुक्ताच्या भूमिकेत स्वरदा पाहायला मिळत आहे. पण तेजश्री आणि 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चाहत्यांनी अजूनही मुक्ता म्हणून स्वरदाला स्वीकारलेलं दिसत नाहीये. मालिकेच्या प्रत्येक प्रोमोवर 'जुन्या मुक्ताला परत आणा', 'तेजश्री पाहिजे होती', 'टीआरपी घसणार' अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांच्या पाहायला मिळत आहेत. आता तेजश्रीच्या एक्झिटनंतर 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला मोठा फटका बसल्याचं समोर आलं आहे. सध्या मालिकेसाठी महत्त्वाची गोष्ट आहे टीआरपी. काही दिवसांपूर्वी १८ जानेवारी ते २४ जानेवारीपर्यंतचा टीआरपी रिपोर्ट समोर आला.

## सई देणार खास सरप्राईज



मालिका, चित्रपटसृष्टी व वेब सीरिज अशा मनोरंजनाच्या तिन्ही माध्यमांतून अभिनेत्री सई ताम्हणकरने मोठं नाव कमावलं आहे. सई कायम वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिका साकारताना दिसते. सई सोशल मीडियावरही कायम सक्रिय असते. ती कायम तिच्या खासगी आयुष्यासह कामाबद्दल विविध अपडेट्स देत असते. नुकतीच तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करीत तिच्या आगामी प्रोजेक्टची माहिती दिली आहे.सईने नुकतीच तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये सईचा नेटफ्लिक्स प्लॅटफॉर्मवरील एक फोटो आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये तिने लवकरच सर्वांसाठी एक खास सरप्राईज असल्याचं म्हटलं आहे. तसेच "३ फेब्रुवारी रोजी नेटफ्लिक्सवर काय आहे ते तुम्ही शोधा", असं तिनं यात लिहिलं आहे.सईची ही पोस्ट तिच्या आगामी वेब सीरिजबाबत आहे. ती लवकरच 'डब्बा कार्टेल' या नव्या वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामध्ये सई एका पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. सईने शेअर केलेल्या पोस्टप्रमाणे 'डब्बा कार्टेल' या वेब सीरिजचा ऑफिशियल ट्रेलर उद्या म्हणजेच ३ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## भारती सिंगला अश्रू झाले अनावर

'द ग्रेट इंडियन लाफ्टर चॅलेंज, 'कॉमेडी सर्कस ३ का तड़का', 'कॉमेडी सर्कस महासंग्राम', 'द कपिल शर्मा शो','कॉमेडी सर्कस के महाबली','कॉमेडी दंगल' अशा विविध कार्यक्रमांतून प्रसिद्ध अभिनेत्री भारती सिंगने मोठी ओळख मिळवली आहे. तिच्या विनोदाचे लाखो चाहते आहेत. भारतीने आपल्या विनोदी अभिनयाने फार कमी काळात चाहत्यांची मोठ्या प्रमाणात पसंती मिळवली आहे. तिने आजवर साकारलेली अनेक विनोदी पात्रे तुफान गाजली आहेत. त्यातील लल्ली हे एका लहान मुलीचं पात्र प्रेक्षकांना फार आवडलं होतं. अशात भारतीने नुकताच बॉलीवूडच्या किंग खान म्हणजेच शाहरुख खानबरोबरचा 'कॉमेडी नाइट्स बचाओ'मधील एक किस्सा सांगितला आहे. भारती सिंग नुकतीच 'द ठगेश शो'मध्ये आली होती. यावेळी तिने शाहरुख खानबरोबरचा 'कॉमेडी नाइट्स बचाओ'मधील एक किस्सा सांगितला आहे. या शोमध्ये भारतीने शाहरुख खानला तिने साकारलेली 'लल्ली' ही भूमिका करण्यास सांगितले होती. तिच्या एका शब्दावर शाहरुख ही भूमिका करण्यासाठी तयार झाला होता. हा किस्सा सांगताना भारती म्हणाली, "त्यावेळी त्या इंडस्ट्रीमध्ये मी नवीन होते आणि गावावरून आले होते. तेव्हा माझ्या मनात शंका होती, शाहरुख खान सर खरोखर लल्ली हे पात्र साकारतील की नाही?" "मला शाहरुख यांच्याबद्दल त्यावेळी फारशी कल्पना नव्हती. कारण- मी तोपर्यंत 'मन्नत'सुद्धा पाहिलं नव्हतं. शोमध्ये मी शाहरुख सरांना म्हणाले की, सर तुम्ही 'लल्ली'प्रमाणे तयार व्हाल का? ते लगेचच हो म्हणाले.

## श्रेयाच्या वाढदिवसानिमित्त कुशलची खास पोस्ट



'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाने महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांना अनेक वर्षे खळखळून हसवले. त्यातील कुशल बद्रिके, भाऊ कदम, श्रेया बुगडे, सागर कारंडे, भारत गणेशपुरे, नीलेश साबळे हे कलाकार आणि त्यांच्या विनोदाने सर्वांना भुरळ घातली होती. श्रेया बुगडेने या कार्यक्रमात साकारलेल्या अनेक भूमिका आजही तिच्या चाहत्यांना पाहाव्याशा वाटतात. अशात आज श्रेयाचा वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त कुशल बद्रिकेने तिच्यासाठी एक विनोदी पोस्ट शेअर केली आहे.कुशल बद्रिकेने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. त्यामध्ये दोघेही 'कोस्टा कॅफे'समोर उभे आहेत. त्यावर कुशल श्रेयाला म्हणतो की, आपल्या आई-बाबांनी आपल्याला किती कष्टानं वाढवलं आहे ना... त्यावर श्रेया म्हणते हो खरं आहे. पण, त्यांच्या आई- बाबांनी यांना कोस्टानं वाढवलं आहे आणि दोघेही 'कोस्टा कॅफे'कडे पाहतात. हा मजेशीर विनोदी व्हिडीओ पोस्ट करीत कुशलने त्यावर कॅप्शनमध्ये श्रेयाबरोबर त्याची मैत्री कशी आहे हे व्यक्त केलं आहे."श्रेया यार तुला भेटल्यावर माझी खात्री पटली की, लग्नाच्या गाठी जशा "स्वर्गात" बांधल्या जातात. तशाच मैत्रीच्या गाठी ह्या "नरकात" बांधल्या जातात. आपण सोबत असलो तर नरकातल्या शिक्षासुद्धा आनंदाने भोगू. अमुक एक शिक्षा अनुभवायची असेल तर काय किडे करावे लागतात हे विचारून तेसुद्धा पूर्ण करू पण एकट्याने स्वर्ग गाठायची वेळ आलीच तर... नकोसा होईल तो, स्वर्गसुद्धा नरक वाटेल!", असं कुशलने कॅप्शनमध्ये लिहिलं आहे. तसेच पुढे त्याने लिहिले, "म्हणून सांगतो 'माझ्यासारखं' थोडं थोडं पुण्य करत जा अधूनमधून, बाकी मी स्वर्गात वशिला लावतो तुझा. टेन्शन नाय!! आणि हो वाढदिवसाच्या शुभेच्छा." श्रेया बुगडे आणि कुशल बद्रिके या दोघांची मैत्री किती खास आहे हे त्याने शेअर केलेली पोस्ट पाहून समजत आहे.कुशलने शेअर केलेल्या या पोस्टवर श्रेयानेही मजेशीर कमेंट केली आहे. तिने यावर कुशलला थेट प्रश्न विचारला आहे. "माझ्या वाढदिवसाला तू हे पोस्ट करणार आहेस हे तू मला का सांगितलं नाहीस?, मला कॉल कर...", असं श्रेयाने यावर कमेंट करीत लिहिले आहे. श्रेया आणि कुशल दोघेही नुकतेच 'झी मराठी' वाहिनीच्या 'मकर संक्रांत विशेष उत्सव गोड नात्यांचा' मध्ये झळकले होते. येथेही दोघांनी त्यांच्या विनोदी शैलीने प्रेक्षकांना खळखळून हसवले. कुशल बद्रिकेच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास 'चला हवा येऊ द्या'नंतर तो 'मॅडनेस मचायेंगे' या कार्यक्रमात दिसला होता.

घोषच्या ९४ धावांवर पाणी

## भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून पराभव

# एक चूक इंडियाला महागात पडली!

## क्लार्क नाबाद ८४ निर्णायक धावा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका मजा संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाला फलंदाजीत हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. पण ऋचा घोषच्या ९४ धावांच्या दमदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने २५१ धावांपर्यंत मजल मारली. या धावांचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण क्लार्कने नाबाद ८४ आणि ट्रायॉनने ४९ धावांची खेळी करत भारतीय संघावर ३ गडी राखून विजय मिळवला.**







या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २५२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला पहिल्याच षटकात मोठा धक्का बसला. तजमीन ब्रिट्स् शून्यावर माघारी परतली. पण दुसऱ्या बाजूने कर्णधार लॉरा वोल्वाईटने भारतीय गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. तिने सलामीला फलंदाजी करताना १११ चेंडूंचा सामना करत ७० धावांची खेळी केली. पण त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी पुनरागमन केलं आणि दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज संघर्ष करताना दिसून आले.सुने लुस अवघ्या ५ धावांवर माघारी परतली. तर मॅरीजॅन कॅपने २०, अँनेके बॉशने १, सिनालो जाफ्ताने १४ धावांची खेळी केली. शेवटी क्लो ट्रायॉनने ४९ धावांची खेळी केली. ट्रायॉनने दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या अगदी जवळ पोहोचवलं होतं, पण स्नेह राणाने तिला बाद करत माघारी धाडलं.ट्रायॉन बाद होऊन माघारी परतली, पण डी क्लार्कने मोठे फटके खेळून दक्षिण आफ्रिकेला सामन्यात टिकवून ठेवलं. ४९ व्या षटकात २ षटकार मारून तिने दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकून दिला. भारतीय संघाकडून ८ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना ऋचा घोषने ९४ धावांची खेळी केली. तर दक्षिण आफ्रिकेकडून ८ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना क्लार्कने नाबाद ८४ धावांची खेळी करत दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवून दिला.शेवटच्या ४ षटकात तर भारतीय संघाला विजयाची सुवर्णसंधी होती. शेवटच्या २४ चेंडूत दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ४१ धावांची गरज होती. त्यावेळी भारतीय संघाकडून ४७ वे षटक टाकण्यासाठी क्रांती गौड गोलंदाजीला आली होती. त्यावेळी क्लार्क स्ट्राईकवर होती. क्लार्कने लागोपाठ २ षटकार आणि १ चौकार मारला. या षटकातील पहिला चेंडू तिने वाईड चेंडू टाकला होता. या षटकात दक्षिण आफ्रिकेने १८ धावा वसूल केल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेने सामन्यात पुनरागमन केलं. पुढील १८ चेंडूत दक्षिण आफ्रिकेला अवघ्या २३ धावा करायच्या होत्या. दक्षिण आफ्रिकेकडून क्लार्कने ४९ व्या षटकात २ षटकार मारून सामना आपल्या नावावर केला. आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पार पडला. या सामन्यात फलंदाजी करताना ऋचा घोषच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. भारतीय संघ अडचणीत असताना तिने ७७ चेंडूंचा सामना करत ९४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ११ चौकार आणि ४ षटकार खेचले. तिचं शतक अवघ्या ६ धावांनी हुकलं पण तिच्या नावे एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. या सामन्यातील पहिल्या डावातील शेवटच्या षटकात ऋचा घोष शतक झळकावण्याच्या अगदी जवळ पोहोचली होती. या षटकात तिने लागोपाठ चौकार मारले. षटकातील चौथ्या चेंडूवर तिने षटकार मारण्याच्या प्रयत्न केला. मात्र षटकार मारण्याच्या प्रयत्नात ती बाद होऊन माघारी परतली. दरम्यान ती वनडे वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय महिला संघाकडून सर्वात मोठी खेळी करणारी यष्टिरक्षक फलंदाज ठरली आहे. या विक्रमात तिने फौजीह खलील यांना मागे टाकलं आहे. फौजीह यांनी १९८२ मध्ये इंग्लंडविरुद्ध खेळताना ८८ धावांची खेळी होती. तर अंजू यांनी १९९३ मध्ये वेस्टइंडिजविरुद्ध खेळताना ८४ धावांची खेळी केली होती. या यादीत ती आता अव्वल स्थानी पोहोचली आहे.

## लुस अवघ्या ५ धावांवर माघारी

मात्र त्याला या संधीचा फायदा उठवता आला नाही. वनडे संघातून डच्चू देण्यात आल्याने लबूशेन ॲशेस मालिकेसाठी शेफील्ड शिल्डचे सामने खेळून तयारी करू शकतो. रेनशॉने ऑस्ट्रेलिया ए संघासाठी खेळताना सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. सध्या तो मधल्या फळीत खेळत आहे मात्र ॲशेस मालिकेसाठी त्याचा सलामीवीर म्हणून विचार होऊ शकतो.

# रोहित, विराटचा अनुभव बहुमूल्य!

## विश्वचषकासाठी दुर्लक्ष करणार नसल्याचे गिलचे स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा अनुभव आमच्यासाठी बहुमूल्य आहे. त्यामुळे एकदिवसीय विश्वचषकासाठी संघबांधणी करताना त्यांच्यासारख्या गुणवान खेळाडूंकडे दुर्लक्ष करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने स्पष्ट केले. अजित आगरकर यांच्या निवड समितीने २०२७ मध्ये आफ्रिकेत होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीला आतापासूनच सुरुवात केली आहे.**



३८ वर्षीय रोहितच्या जागी २६ वर्षीय गिलकडे नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली आहे. गिलने कसोटी संघाचा कर्णधार म्हणून चांगली सुरुवात केली असून आता एकदिवसीय क्रिकेटमध्येही यशस्वी ठरण्याचा त्याचा मानस आहे. त्यासाठी अनुभवी खेळाडूंची साथ गरजेची असल्याचे गिलने नमूद केले आहे. "रोहितभाई आणि विराटभाई यांच्या गाठीशी मोठा अनुभव आहे. त्यांनी अनेक सामने खेळले असून भारताला अनेक सामने जिंकवूनही दिले आहेत. त्यांच्याइतके कौशल्य, प्रतिभा आणि अनुभव असलेले खेळाडू तुम्हाला भारतातच काय, तर जगभरातही सहजासहजी सापडणार नाहीत. त्यामुळे ते एकदिवसीय संघाचा भाग असल्याचा मला आनंदच आहे," असे गिलने सांगितले. विंडीजविरुद्ध शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीच्या पूर्वसंध्येला झालेल्या पत्रकार परिषदेत गिलला या सामन्याइतकेच रोहित आणि विराट यांच्या भवितव्याबाबत प्रश्न विचारण्यात आले तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे.

## खेळीमेळीचे वातावरण निर्माण

कर्णधार म्हणून रोहितकडून खूप गोष्टी शिकल्या असून त्यांचा मला निश्चितपणे फायदा होईल असे गिल म्हणाला. रोहितभाईकडे अनेक गुण आहेत, जे मला घ्यायला आवडतील. त्याचा विशेष गुण म्हणजे तो अतिशय शांत आहे. कितीही दडपण असले, तो संयमाने निर्णय घेतो. तसेच त्याने ड्रेसिंग रूममध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 10 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करत

# विद्यार्थ्यांनी साजरा केला शिक्षकदिन!

### शिक्षण विश्व: माईरचे, एमआयटी महाविद्यालयातील कौतुकास्पद उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**माईरचे, एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (डी), पुणे येथील व्यवसाय प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागातर्फे सामाजिक विस्तार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या निमित्ताने शिक्षक दिन सामाजिक जाणिवेतून साजरा करण्यात आला.**



या कार्यक्रमाचे नेतृत्व तृतीय वर्ष बीबीए इंटरनॅशनल बिझनेसच्या विद्यार्थ्यांनी केले. मधुर घाटे आणि सक्षम अग्रवाल यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाअंतर्गत ३० स्टील प्लेट्स, चमचे, ग्लास, पाण्याची भांडी, दोन मॅट्स, कपड्यांमध्ये जॅकेट, कुर्ता आणि पायजामा, शालेय साहित्यामध्ये नोटबुक, पेन्सिल, पेन, नैतिक कथांवरील पुस्तके, बोक्या सातबंडे ही मराठी कॉमिक्स, बिस्किटे आणि अर्धा किलो सर्फ एक्सेल यांचा समावेश होता. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफरे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. मानसी अतितकर, स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंटचे अधिष्ठाता डॉ. अमोल माने, अधिष्ठाता कॉम्प्युटर सायन्स अँड ॲप्लिकेशन प्रा. रश्मी लाड, विभागप्रमुख श्रीमती आकांक्षा लांडगे, इतर प्राध्यापकवर्ग आणि सुमारे नव्वद विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सामाजिक विस्तार उपक्रम गुरुकुलमधील विद्यार्थ्यांसोबत पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंग, तबला, पक्वाज आणि हार्मोनियमच्या साथीने भजन, हरिपाठ आणि अभंग सादर केले.

गुरुकुलमध्ये ६ ते १५ वयोगटातील मुले शिक्षण घेत असून, त्यांचे मार्गदर्शन महाराज तुषार खाटले करतात. गुरुकुल पद्धतीचे पालन येथे अत्यंत आध्यात्मिकतेने केले जाते. या उपक्रमाच्या निमित्ताने शिक्षक दिन केवळ औपचारिकतेपुरता न राहता सामाजिक बांधिलकीचे भान राखणारा, मनाला स्पर्श करणारा अनुभव ठरला. या कार्यक्रमात डॉ. सुरेखा गायकवाड, डॉ. हनुमंत शिंगाडे आणि प्रा. दिनकर राठोड यांचीही उपस्थिती लाभली.

## तालुका स्तरीय खो खो स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### शिक्षण विश्व: सिद्धांत इंटरनॅशनल स्कूल सुदुंबरे येथे पार पडली स्पर्धा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिद्धांत इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर तालुकास्तरीय खो-खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मावळ तालुक्यातील विविध शाळांनी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खो खो खेळातील कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले.**




क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, ल्हिा परिषद पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे आणि सिद्धांत इंटरनॅशनल स्कूल सुदुंबरे यांच्या संयुक्त विद्यमाने मावळ तालुका स्तरीय शालेय खो खो स्पर्धेचे आयोजन ६ आणि ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सिद्धांत इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर करण्यात आले. मावळ तालुक्यातील विविध शाळांनी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खो खो खेळातील कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय संघाचे प्रशिक्षक आणि शिवछत्रपती राज्य क्रीडा मार्गदर्शक शिरेन गोडबोले उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय पंच आणि प्रशिक्षक देसाई, आंतरराष्ट्रीय खेळाडू निकिता चक्रधर पवार आणि कर्पे यांची उपस्थिती लाभली. याशिवाय सिद्धांत इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य कांबळे, सिद्धांत इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर राजेश जाधव, तसेच मुख्याध्यापिका सुप्रिया साळुंखे यांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली.

खो खो स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे: १४ वर्षे मुले प्रथम क्रमांक – प्रगती विद्यामंदिर इंदोरी द्वितीय क्रमांक – ग्रामप्रबोधनी विद्यालय साळुंबरे तृतीय क्रमांक – कृष्णराव भेगडे इंग्लिश मिडियम स्कूल तळेगाव दाभाडे उत्कृष्ट खेळाडू – गणेश दिवटे. १७ वर्षे मुले: प्रथम क्रमांक – प्रगती विद्यामंदिर इंदोरी द्वितीय क्रमांक – जैन इंग्लिश मिडियम स्कूल तळेगाव दाभाडे, तृतीय क्रमांक – VPS हाय स्कूल लोणावळा उत्कृष्ट खेळाडू – आयुष भोसले. १९ वर्षे मुले: प्रथम क्रमांक – इंद्रायणी विद्यामंदिर तळेगाव दाभाडे द्वितीय क्रमांक – VPS हाय स्कूल लोणावळा तृतीय क्रमांक – MIT ज्युनियर कॉलेज तळेगाव दाभाडे उत्कृष्ट खेळाडू – सिद्धार्थ पवार

१४ वर्षे मुली: प्रथम क्रमांक – श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय शाळा क्रमांक ६ तळेगाव दाभाडे द्वितीय क्रमांक – तुळजाभवानी विद्यालय सोमटणे तृतीय क्रमांक – स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल तळेगाव दाभाडे, उत्कृष्ट खेळाडू – तनुजा बुरुडे.

१७ वर्षे मुली: प्रथम क्रमांक – श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय शाळा क्रमांक ६ तळेगाव दाभाडे द्वितीय क्रमांक – रामभाऊ परुळेकर विद्यानिकेतन तळेगाव दाभाडे तृतीय क्रमांक – जैन इंग्लिश स्कूल तळेगाव दाभाडे उत्कृष्ट खेळाडू – सिद्धी केदारी. १९ वर्षे मुली प्रथम क्रमांक – MIT ज्युनियर कॉलेज तळेगाव दाभाडे द्वितीय क्रमांक – VPS हाय स्कूल लोणावळा तृतीय क्रमांक – आदर्श विद्यामंदिर तळेगाव दाभाडे उत्कृष्ट खेळाडू – गायत्री गायखे

स्पर्धेनंतर पार पडलेल्या बक्षीस वितरण समारंभात विजेत्या संघांना चषक देऊन गौरविण्यात आले.

## पहिली नोकरी निवडताना आजचा काळ डिजिटलायझेशनचा आहे हे लक्षात घ्यावे

# समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता सिद्ध करा!

### डॉ. प्रसाद प्रधान : पीसीयू मध्ये 'इन्स्पिरा' मालिकेतून विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट यशासाठी मार्गदर्शन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कार्पोरेट क्षेत्राच्या बदलणाऱ्या व नेहमी वाढत जाणाऱ्या अपेक्षा नव पदवीधरांनी आत्मसात केल्या पाहिजेत. पहिली नोकरी निवडताना आजचा काळ डिजिटलायझेशनचा आहे हे लक्षात घ्यावे. वेळोवेळी येणाऱ्या अडथळ्यांवर मात करून, जबाबदारी घेऊन समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता सिद्ध करावी लागेल. त्यासाठी तुमच्यामध्ये सहनशीलता, स्वभावात लवचिकता हवी आणि समर्पण भावनेने काम करणे आवश्यक आहे. तरच तुमच्या व्यावसायिक आकांक्षा या नोकरी मधून पूर्ण होतील, असे मार्गदर्शन पंतप्रधान कार्यालयाचे माजी अर्थ सल्लागार व जागतिक अर्थतज्ञ डॉ. प्रसाद प्रधान यांनी केले.**




बुधवारी (दि.८) पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) उद्योग - विद्यापीठ संवाद केंद्राच्या माध्यमातून "पीसीयू इन्स्पिरा" या इंडस्ट्री लीडर लेक्चर सिरीज अंतर्गत "जनरल अवेअरनेस ऑन कॉर्पोरेट रिक्वायरमेंट फ्रॉम फ्रेशर्स – कॅम्पस टू करिअर" या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, प्र उपकुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, औद्योगिक संबंध संचालक डॉ. प्रणव चरखा, मार्केटिंग हेड व समन्वयक जमीर मुल्ला, स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे विभाग प्रमुख डॉ. अमित पाटील स्कूल ऑफ कॉम्प्युटर एप्लीकेशन चे विभाग प्रमुख डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते.

डॉ. प्रसाद प्रधान यांनी सांगितले की, प्लेसमेंट प्रक्रियेतील काळात विद्यार्थ्यांना ताण तणाव येऊ शकतो. आत्मनिर्भर संकल्पनेचा अंगीकार केल्यास व योग्य मार्गदर्शन घेऊन दृढ निश्चयाने, अनुभव घेऊन उद्योजक होणे देखील शक्य आहे. सध्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (जीसीसी) धोरणानुसार परदेशी गुंतवणूक वाढत आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीच्या खूप नव्या संधी निर्माण होत आहेत. मुंबईत झालेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हलचे मध्ये भारताची डिजिटल बँकिंग आणि वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक नेतृत्व क्षमता अधोरेखित झाली असल्याचे सांगितले. तसेच, औषधनिर्माण क्षेत्र आणि डेटा सायन्स या क्षेत्रांतील वाढत्या संधी विद्यार्थ्यांना पुरक ठरणाऱ्या आहेत. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेने आणि औद्योगिक सामर्थ्याने तरुणांसाठी विपुल संधी निर्माण होत असल्याचा विश्वास डॉ. प्रधान यांनी व्यक्त केला.

स्वागत, प्रास्ताविक करताना डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, यांनी "पीसीयू इन्स्पिरा" उपक्रम हा उपक्रम विद्यार्थ्यांना उद्योगविश्वातील वास्तव परिस्थितीची ओळख करून देण्यासाठी आणि करिअर मधे सक्षम बनवण्यासाठी राबवला जातो. पीसीयू मध्ये विद्यार्थ्यांना व्यवहार्य शिक्षण, बिझनेस केस स्टडीज आणि नेतृत्व विकासाचे मार्गदर्शन देण्यात येते.

डॉ. प्रणव चरखा यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे व्यवस्थापन नेहमी उद्योगसंपृक्त शिक्षण पद्धती आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी कटिबद्ध आहे.

सूत्रसंचालन अक्षता राजगौरव, आभार संगीता मुखर्जी यांनी मानले. कुलपती तथा पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

---

## भाजप युवा मोर्चाकडून पुरग्रस्तांसाठी "एक हात मदतीचा"

### युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांचा पुढाकार; 500 किटचे वाटप करणार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या महिन्याभरात मराठवाडा भागांमध्ये पावसाने धुमाकूळ घातला. हातातोंडाला आलेले शेतातील उभे पीक पावसाने वाहून नेले. शेती अक्षरशः खरवडून निघाली. बळीराजाच्या या संकटात पिंपरी चिंचवड भाजप युवा मोर्चा नागरिक आणि शेतकरी बांधवांच्या सोबत असून पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा दिला आहे. पिंपरी चिंचवड भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुरग्रस्त नागरिकांसाठी पुढाकार घेतला आहे.**




पिंपरी चिंचवड भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव व युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने 500 मदत किट तयार करून पूरपरिस्थितीत अडकलेल्या बांधवांसाठी पाठविण्यात येणार आहेत.

या मदत किटमध्ये अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, स्वच्छतेसाठी साहित्य आणि काही वैद्यकीय सामग्रीचा समावेश आहे.

पूरग्रस्त भागातील नागरिकांना तातडीची मदत मिळावी, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असल्याची माहिती यादव यांनी दिली.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046